# लोकमान्य टिळकांच्या जहाल विचारांचा वऱ्हाडच्या जनतेवरील प्रभाव

**राजानंद पट्टेबहादूर**

कुलदेवी निवास सोसायटी,
उल्हासनगर —४, जि. ठाणे.
राज्य — महाराष्ट्र

## प्रस्तावना :—

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतामध्ये खऱ्या अर्थाने राष्ट्रवादाला सुरुवात झाली होती. सुशिक्षित वर्गाकडून भारतीय समाजाचे मंथन सुरु झाले होते. सन १८५७ च्या उठावानंतर भारतातील आपल्या नीतीमध्ये ब्रिटिशांनीही बदल केला होता. भारतातील तत्कालीन परिस्थितीला ब्रिटिश सरकारच जबाबदार असल्याचा भारतातील काही सुशिक्षित तरुण वर्गाला वाटत होते. पुढे यातुनच ब्रिटिशां विरोधी भारतीय स्वातंत्र्याची चळवळ सुरु झाली होती.

महाराष्ट्रातील विदर्भातील वऱ्हाड भागामध्ये राष्ट्रवादाचा प्रसार व्हायला सुरुवात झाली होती होता . वऱ्हाड हा तत्कालीन अकोला, अमरावती, बुलढाणा आणि यवतमाळ जिल्हयांचा बनलेला होता. ब्रिटिश सरकार विरोधी आंदोलनाला सुरुवात झाल्यानंतर लोकमान्य टिळकांचे अनेकदा वऱ्हाड प्रांतात दौरे झाले होते. त्यांच्या जहालवादी विचारांचा प्रभाव वऱ्हाडातील जनतेवर कसा पडला या बाबतचा उहापोह या लेखात केला आहे.

## * वऱ्हाड सार्वजनिक सभा :—

पुणे येथील सार्वजनिक सभेच्या धर्तीवर वऱ्हाडात अमरावतीत २७. १२.१८८६ त वऱ्हाड सार्वजनिक सभा'' स्थापना केली होती. अमरावतीचे तीन वकील सर मोरोपंत जोशी, रा. ब. मुधोळकर व दादासाहेब खापर्डे आणि अकोल्याचे वकील रा. ब. देवराम विनायक दिगंबर यांनी पुढाकार घेतला होता.[१]

या सभेने जनतेमध्ये जाऊन जनतेच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला होता. पुढे दादासाहेब खापर्डेंचे नेतृत्व हळूहळू उदयाला आले.

## * लोकमान्य टिळक आणि वऱ्हाडातील सामाजिक परिषद :—

नागपुरला १८९१ साली सोशल कॉन्फरन्स म्हणजे सामाजिक परिषद भरली होती. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे व बाळ गंगाधर टिळक या परिषदेसाठी आले होते. न्यायमूर्ती रानडे यांच्या आग्रहावरुन दादासाहेब खापर्डे यांनी या परिषदेचे अध्यक्षपद स्विकारले होते. प्रास्ताविक भाषणात न्यायमूर्ती रानडे काही रिपोर्ट वाचन करीत असतांनाच बाळ गंगाधर टिळक ताडकन उठून उभे राहिले व म्हणाले की, ''This is all issue of lies and false hood'' त्यावर टिळक आणि अध्यक्षपदी असलेले दादासाहेब खापर्डे यांच्यात खटका उडाला अखेर दादासाहेब खापर्डे टिळकांना म्हणाले, ''बळवंतराव अध्यक्ष या नात्याने तुम्हाला या सभेतून बाहेर काढण्याचा मला आदेश द्यावा लागेल. त्यानंतर बळवंतराव शांत झाले.[२] पुढील काळात दादासाहेब खापर्डे आणि लोकमान्य टिळक यांच्यात खूप मैत्री जमली. दादासाहेब खापर्डे यांना जनता वऱ्हाडचे नवाब म्हणत असे. त्यांचा जनतेवर मोठा प्रभाव होता. टिळकांच्या जहाल विचारांचा प्रभाव वऱ्हाडातील जनतेवर जाणवत होता.

## * लोकमान्य टिळकांची चतु:सूत्री आणि वऱ्हाडातील जनतेचा पाठिंबा :—

स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, बहिष्कार या चतु: सूत्रीच्या जोरावर वऱ्हाडात सुध्दा जहाल राष्ट्रीयत्वाची लाट निर्माण झाली होती.

अमरावतीला लोकमान्य टिळकांच्या चतु:सूत्रीचा व जहाल राजकारणाचा परिमणाम दिसू लागला. अमरावतीचे वासुदेवराव खोत यांनी 'स्वदेशी' चे दुकान काढले. सन १८९९ मध्ये वऱ्हाडमध्ये आणि यवतमाळमध्ये लोकमान्य टिळकांचे 'केसरी' वृत्तपत्र मिळत होते, दारव्हा येथे गोविंदराव दाणी आणि बाबासाहेब परांजपे यांनी चार माणसे एकत्र जमवावी व केसरीचे वाचन करावे ही प्रथा सुरु केली.[३]

केसरी वृत्तपत्राच्या विविध लेखांचा परिणाम वऱ्हाडातील जनतेवर दिसत होता. तपस्वी बाबासाहेब परांजपे, शामराव दादा देशपांडे, पृथ्वीगीर हरिगीर गोसावी, दत्तोपंत काणे, गणपतराव मालवी, दादासाहेब कोठेकर, गोपाळराव टोंगो, टिकले, मारोतराव जामनकर, कृष्णाजी लक्ष्मण पेशवे हया मंडळींनी एकत्र येऊन लोकमान्यांच्या चतु:सूत्री, वृत्तपत्रे, राष्ट्रीय शाळा काढणे, स्वदेशी व बहिष्काराचा प्रचार करणे या तंत्राचा वापर करण्याचे ठरविले यातूनच पृथ्वीगीर गोसावी यांनी हरिकिशोर या नावाचे वृत्तपत्र सन १९०५ मध्ये काढले.[४]

लोकमान्य टिळकांना २४ जून १९०६ रोजी राजद्रोहाच्या गुन्हयाखाली सहा वर्षांची शिक्षा सुनावल्यानतर संपूर्ण विदर्भ वऱ्हाड प्रांतात संताप निर्माण झाला. लोक सामुहिकरित्या शपथा घेऊ लागले की, ''आम्ही स्वदेशी वृत्ताचे आचरण करु व विदेशी मालाचा बहिष्कार करु'' वहाऱ्हाडातील अनेक ठिकाणी विदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकण्याचे ठराव पारीत होऊ लागले.[५]

लोकमान्य टिळकांच्या अटकेचा निषेध करणारं आंदोलन इतकं तीव्र झालं की वऱ्हाडचे कमिशनर सर फ्रॅंक स्लाय यांनी यवतमाळच्या प्रमुख नागरिकांची बैठक घेऊन त्यांना धमकावले की, जर तुम्ही हे आंदोलन आटोपतं घेतलं नाही तर सरकार कडक पाऊल उचलेल.[६]

लोकमान्य टिळकांची स्वदेशी व बहिष्कार या विषयांवरील भाषणे खूपच मंत्रमुग्ध करणारी असत. सर्व जनतेवर त्याचा फार मोठा परिणाम होत असे. त्यात तरुण आणि विद्यार्थ्यांवर फार मोठा परिणाम झाला होता. त्यामुळेच हा वर्ग मोठया उत्साहाने भारतीय स्वातंत्र्यलढयात उतरलेला आढळून येतो.'' १७ जुलै, १९०६ रोजी दादासाहेब खापर्डे (अमरावती) यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्यांची एक विराट सभा झाली. या सभेत विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने विदेशी कपडयाची होळी केली आणि स्वदेशी कापड वापरण्याच्या शपथा घेतल्या. टिळकांच्या पैसा फंडालाही विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला होता.''[७]

लोकमान्य टिळकांनी शिवजयंती उत्सव आणि गणेशोत्सवाला सुरुवात करुन भारतीय जनतेला एकत्र येण्याचे एकप्रकारे व्यासपीठ तयार करुन दिले होते. या निमित्ताने जनता एकत्र येऊन चर्चा करीत असे. विशेष म्हणजे तरुण वर्ग आणि विद्यार्थी वर्ग या निमित्ताने एकत्र येऊन विविध विषयांवर चर्चा करीत विविध धर्माचे लोक एकत्र येऊन उत्सव साजरा करीत असत.

अमरावती येथे दादासाहेब खापर्डे यांनी गणेशोत्सव १८९९ मध्ये आणि शिवाजी उत्सव इ.स. १९०० मध्ये सुरु केले. या बरोबरच दादासाहेबांनी अकबर उत्सव, वीरशैव जयंतीत्सव सुरु केले. पुण्यामध्ये इ.स. १८९४ साली गणेशोत्सव झाला त्याचे अध्यक्षपद दादासाहेब खापर्डे यांना देण्यात आले होते.[८]

अमरावतीमध्ये शिवजयंती आणि गणेशोत्सव या बरोबरच इतर उत्सव दादासाहेबांनी सुरु करुन सर्वधर्मसमभावाची भावना जोपासली असेच म्हणावे लागेल कारण या कार्यक्रमाला मुसलमान, पारशी, ख्रिस्ती लोकसुद्धा सहभागी होत असत. या ठिकाणी अनेकांची भाषणे होत असत. अशा कार्यक्रमामधूनच बापुजी अणे, बाबा परांजपे, दादा शेवडे, वीर वामनराव जोशी सारखे लोक पुढे आले आणि या लोकांनीच वऱ्हाडमधील स्वातंत्र्य चळवळीला पुढील काळात दिशा दिल्याचे स्पष्ट होते.

अमरावती येथे भाषण करतांना लोकमान्य टिळकांनी शिवजयंती उत्सवाचे महत्व सांगितले. अफजलखानाला ठार मारुन तयांनी जुलूम आणि त्रासापासून लोकांची सुटका केली. त्यांच्या शूर कृ त्यामुळेच हे शक्य झाले त्यामुळे आपण सुद्धा विचार भिन्नता विसरुन राष्ट्राशी एकनिष्ठ राहण्याचा सल्ला टिळकांनी लोकांना दिला.[९]

लोकमान्य टिळकांनी २ मे १९०८ साली अकोला येथे भाषणामध्ये २० हजार श्रोत्यांच्या समक्ष सुप्रसिध्द घोषणा केली होती. ''स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळविणारच''[१०]

या घोषणेने वऱ्हाडातील जनताच नव्हे तर संपूर्ण भारतातील जनता भारावून गेली होती.

अकोला येथेच शिवजयंती उत्सवाच्या वेळी भाषण करतांना टिळक म्हणाले की, कित्येक यात्रेकरुंना स्वराज्य गंगेचा ओघ डोळयांना दिसतो, म्हणून ते लांबची सफर करु पाहता, कित्येकांना ती दिसत नाही किंवा लांबची यात्रा झेपत नाही, त्यांनी गोदावरीचे काठी आपले पारणे फेडण्यास हरकत नाही पण आमचा काशीस जाऊन पोहचल्यावर तेथेच पारणे फेडण्याचा संकल्प आहे. मग वाट चुकल्यामुळे किंवा वाटेतील जंगलामुळे अथवा वाटमार झाल्यामुळे किंवा पाय दुखल्यामुळे अर्ध्यामुर्ध्या वाटेतंही जर आम्ही गतप्राण झालो, तरी आमच्या मरण काळच्या भावनेच्या जोरावर आमचे राष्ट्र स्वराज्याची यात्रा पुरी करुन गंगा किनारीच राष्ट्रीय पारणे झोडल्यांवाचून राहणार नाही.[११]

अशाप्रकारे स्वराज्यासाठी आपण सर्वांनी मनाची तयारी करावी असे आवाहन लोकमान्य टिळक करीत असत. याचा परिणाम असा झाला की वऱ्हाडातील जनता ब्रिटिश विरोधी भारतीय स्वातंत्र्य लढयात उतरायला मानसिकरित्या तयार झाली.

## * वंगभंग आंदोलन आणि वऱ्हाडातील जनतेचा पाठिंबा :—

बंगालच्या फाळणी विरोधात सुरु झालेले वंगभंग आंदोलन संपूर्ण देशात पसरले. त्याला वऱ्हाडही अपवाद नव्हता.

लोकमान्य टिळकांच्या वेळोवेळी झालेल्या आगमनामुळे आणि अमरावतीचे त्या काळातील जननेते असलेले दादासाहेब खापर्डे हे टिळक मतानुवर्ती असल्यामुळे त्या काळच्या मानाने शहरांत राष्ट्रीय जागृती सुरु झाली होती. राजकीय सभा होत असत, यामुळे विद्यार्थी सुध्दा अलिप्त नसत. याच सुमारास वंगभंगाची चळवळ सुरु झाली. अमरावती शहरात सभा घेणे सुरु झाले. या सभांना सरकारी हायस्कूलच्या बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांनी जाऊ नये असा सक्त आदेश हेडमास्तरांनी काढूनही विद्यार्थ्यां एकजूट करुन सभांना हजर राहिले.[१२]

लोकमान्य टिळक वऱ्हाडातील नेते दादासाहेब खापर्डे आणि डॉ. बी.एस.मुंजे हे वंगभंग चळवळीला पाठींबा देण्यासाठी कलकत्याला दि. ४ जून, १९०६ रोजी गेले होते. तेथे सर्वांचे जोरदार स्वागत झाले. टिळकांचे भाषण झाले, त्यानंतर दि. ६ जून, १९०६ रोजी दादासाहेब खापर्डे आणि डॉ. मुंजे यांची स्वदेशी विषयांवर भाषणे झाली.[१३]

वऱ्हाडचे नेते राष्ट्रीय स्तरावर पोहोचल्याचे हे द्योतक होते. वऱ्हाडातील नेत्यांचा, जनतेचा लोकमान्य टिळकांना पाठींबा होता, त्यामुळेच वऱ्हाडात टिळकांची लोकप्रियता वाढली होती.

वंगभंग आंदोलनाच्या समर्थनार्थ लोकमान्य टिळकांनी केसरी वृत्तपत्रात दि. १५ ऑगस्ट, १९०५ रोजी 'आणीबाणीची वेळ' या मथळयाखाली एक लेख लिहून स्वावलंबी राजकारणाचे नवे धोरण महाराष्ट्रापुढे मांडिले. आता केवळ लोकमत जागृत करुन आणि व्यक्त करुन भागणार नाही तर बंगालच्या सभेत जर सरकार आपले म्हणणे ऐकत नसेल तर विलायती माल न वापरण्याची शपथ घेऊ.[१४]

केसरी वृत्तपत्राचे वाचन वऱ्हाडातही होत असे. साहजिकच तरुण वर्गाने परदेशी वस्तूंवर बहिष्कार घालण्याचे धोरण अवलंबविले होते. या निमित्ताने वऱ्हाडातील जनतेने ब्रिटिश विरोधात लढा अधिक व्यापक केल्याचे स्पष्ट होते.

## * लोकमान्य टिळकांच्या जहाल विचारांचा वऱ्हाडातील जनतेवरील प्रभाव :—

जहाल विचारांचे नेते म्हणून संपूर्ण भारतभर लोकमान्य टिळक, बिपिनचंद्र पाल, लाला लजपतराय यांचा परिचय होता. याच जहाल विचारांचा वऱ्हाडातील लोकांवर प्रभाव पडला होता.

१८९७ मध्ये अमरावती येथे कॉंग्रेसचे अधिवेशन भरणार होते. मात्र यावेळी लोकमान्य टिळक तुरुंगात होते.[१५] त्यामुळे दादासाहेब खापर्डे यांनी लोकमान्य टिळकांची प्रतिमा स्टेजवर लावण्याचा आग्रह धरला. कॉंग्रेस राजद्रोहाचे कौतुक करते असा त्याचा अर्थ घेतला जाईल अशी मवाळ नेत्यांना

भिती होती. शेवटी अध्यक्ष या नात्याने सर शंकरन नायर यांनी आपल्या भाषणात लोकमान्य टिळकांवर अन्याय झाल्याचे सांगितले आणि कॉंग्रेसच्या रेकॉर्डसमध्ये हया गोष्टी राहतील त्यामुळे दादासाहेब यांनी आग्रह मागे घेतला.[१६] यावरुन वऱ्हाड प्रांतातील लोकमान्य टिळकांची लोकप्रियता दिसून येते.

सन १९०८ मध्ये लोकमान्य टिळकांनी वऱ्हाडमध्ये दौरे काढले होते. सर्व विदर्भभर फिरुन लोकमान्यांनी स्वदेशी आणि बहिष्काराचा पुरस्कार केला. मंगरुळ, वाशिम व कारंजा येथे परदेशी कापडांच्या होळया करण्यात आल्या. बुलढाणा जिल्हयातील खामगाव, मेहेर, मलकापूर, चिखली या शहरात जनता लोकमान्य टिळकांची भाषणे ऐकण्यास उत्सूक होती. त्या काळापासून सरकारकडे आपल्या तक्रारी नोंदविण्याच्या कार्यास सुरुवात झाली. मेहेकरचे श्री. दादासाहेब सोमण, खामगावचे डॉ. पारसनीस, बुलढाण्याचे श्री. या.मा. काळे, श्री. कानिटकर, मलकापुरचे श्री. पिंपळकर आदी लोकांनी लोकमान्यांपासून स्फूर्ती घेऊन जनजागृतीचे कार्य केले. [१७]

याच लोकांनी वऱ्हाडमध्ये लोकमान्यांच्या जहाल विचारांचा स्विकार व प्रसार केला होता.

सन १९०७ मध्ये सुरत येथे भरलेले अखिल भारतीय कॉंग्रेसचे अधिवेशन नागपुरला होणार होते. मात्र टिळकांच्या मतप्रणालीचा ठसा वाढत चालल्याची जाणीव कॉंग्रेसच्या सुत्रधारांना झाली होती. तसेच टिळकांनी या परिषदेचे अध्यक्ष व्हावे ही वऱ्हाडच्या जनतेची इच्छा होती. मात्र त्याला स्वत: टिळकांनीच नकार दिला आणि शेवटी अधिवेशन ही सुरत येथे भरले.[१८]

यावरुन हे स्पष्ट होते की, वऱ्हाडातील जनतेवर लोकमान्य टिळकांच्या विचारांचा अधिक प्रभाव होता.

लोकमान्य टिळकांच्या जहालवादी विचारांचा प्रसार मध्यप्रांतात आणि वऱ्हाड मध्ये सन १८९० ते १९१९ च्या दरम्यान झाला होता. लोकमान्य टिळकांचे तीन साथीदार, तीन टिळक भक्तांनी केल्याचे दिसून येते.गणेश श्रीकृष्ण खापर्डे तथा दादासाहेब खापर्डे, डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे आणि माधव श्रीहरी अणे यांचा समावेश होतो.[१९]

लोकमान्य टिळकांच्या विचारांचा यवतमाळमधील तरुण मंडळींवर मोठा प्रभाव पडल्याचे दिसून येते. त्यामुळे ब्रिटिश सरकारची नजर अशा तरुणांवर होती. 'जहाल गटाने यवतमाळला ''केदारेश्वर आटयापाटया क्लब'' काढला होता. दि. ६ ऑगस्ट, १९०५ रोजी यवतमाळ येथे लोकमान्य टिळकांचे आगमन झाल्याने जहालवादी तरुणांमध्ये जोश भरला होता. दि. १६ ऑक्टोंबर, १९०५ रोजी परकीय मालाची होळी केली गेली. यवतमाळमधील टिळकवादी गटाचे नेते खेडयापाडयात स्वदेशी व बहिष्काराच्या प्रचाराला जात असत, या जहाल गटाने सन १९०५ ला विद्यागृह नावाची राष्ट्रीय शिक्षण देणारी शाळा काढली. विद्यागृहाचे अध्यक्ष रामचंद्र रघुनाथ बापट हे वकील होते. तर सचिव म्हणून श्री. माधव श्रीहरी अणे यांनी काम पाहिले. [२०]

## * लोकमान्य टिळकांच्या विचारांचा वऱ्हाडातील महिलांवरील प्रभाव :—

लोकमान्य टिळकांचा वऱ्हाडातील तरुणवर्ग, विद्यार्थी वर्ग, व्यापारी वर्गावर परिणाम झालाच होता. त्याला स्त्रियाही अपवाद नव्हत्या. विदर्भातील महिलांवर लोकमान्य टिळकांचा राष्ट्रीय विचारांचा प्रभाव पडल्याचे दिसून येते. विविध दौरे, प्रचार या दरम्यान लोकमान्य टिळक आपल्या भाषणातून जहाल विचार मांडत असत. लोकमत जागृत करुन सरकारवर दडपण आणणे गरजेचे आहे असे विचार वऱ्हाडच्या दौऱ्यात टिळक मांडीत असत. सन १९०६ ते १९०८ च्या दरम्यान वऱ्हाडात लोकमान्य टिळकांना अमाप लोकप्रियता मिळाली होती. त्यांची भाषणे ऐकण्यासाठी स्त्रियाही मोठया संख्येने जाऊ लागल्या.

२ मे १९०८ च्या अकोल्याच्या राजेश्वर मंदिराच्या पटागणात लोकमान्यांचे भाषण झाले त्याला अनेक स्त्रिया हजर होत्या. [२१]

बुलढाणा जिल्यांत महिल्यांच्यात स्वराज्य प्रेम जागृत करण्याचे काम जानकीबाई कानिटकर यांनी केले होते. इ.स. १९१६ मध्ये होमरुल चळवळीचा प्रसार करण्याकरीता बुलढाणा येथे लोकमान्य

टिळक आले होते त्यावेळेला जानकीबाई कानिटकर यांनी महिलांकडून १०१ रुपये गोळा करुन लोकमान्यांच्या राष्ट्रीय कार्याकरीता दिले होते.[२२]

जानकीबाई कानिटकर, जनाबाई, यशोदाबाई जोशी या स्त्रियांनी लोकमान्यांच्या विचारांचा स्त्रियांमध्ये प्रसार करण्यासाठी प्रयत्न केले होते.

यवतमाळ येथे १६ ऑगस्ट १९०५ रोजी भरलेल्या सभेत स्त्रियांचे कार्य आणि स्त्री शिक्षण या विषयांवर बोलतांना लोकमान्य टिळक म्हणाले की, ''सावटाखाली झाड वाढत नाही म्हणून इंग्रज सत्ता झुगारायला हवी. यवतमाळ वासीयांनो बाहय शक्तींशी तोंड देण्याची इर्ष्या जागवा. ते पुढे म्हणाले की, स्वराज्य संपादनाच्या कामात स्त्रीचे एक स्थान आहे, ते जर नजरेच्या टप्प्यात आलं तर त्याला टिकविण्याचं काम स्त्रीच अधिक योग्य प्रकारे करु शकेल.[२३]

लोकमान्य टिळकांच्या विचारांनी प्रेरित होऊन स्वातंत्र्य लढयात उतरण्याची मानसिक तयारी स्त्रियांनी केली होती. पुढील काळात महात्मा गांधीच्या आवाहानाला प्रतिसाद देत. वऱ्हाडातील स्त्रियांनी भारतीय स्वातंत्र्यलढयात मोठया प्रमाणात भाग घेतल्याचे दिसून येते.

## * लोकमान्य टिळक आणि वऱ्हाडातील क्रांतीकारक :—

लोकमान्य टिळकांच्या जहाल विचारांनी प्रेरित होऊन अनेक तरुणांनी क्रांतीकारी कार्यात स्वत:ला झोकून दिले होते. लोकमान्य टिळकांचे वऱ्हाडातील खास स्नेही दादासाहेब खापर्डे यांचा क्रांतीकारकाशी जवळचा संबंध होता.

लोकमान्य टिळकांच्या सांगण्यावरुन नाटयाचार्य कृष्णाजी प्रभाकर उर्फ काकासाहेब खाडिलकर यांनी सन १९०२ ते १९०४ या काळात नेपाळात वास्तव्य केले होते. तेथे बंदुका तयार करण्याचा कारखाना घालण्याचा त्याचा प्रयत्न होता. हेच ते प्रसिद्ध नेपाळ प्रकरण होय. त्यासाठी ग्वाल्हेरचे केतकर यांच्याकडून नकाशे मिळविण्यासाठी लागलेले अडिचशे रुपये अमरावतीचे दादासाहेब खापर्डे यांनी खाडीलकरांना दिलेले होते. तसेच नेपाळात खाडीलकरांची काळजी घेण्यासाठी आणि त्यांची सेवाशुश्रुषा करण्यासाठी दादासाहेब खापर्डे यांनी त्यांच्या घरी आश्रीत म्हणून राहणाऱ्या रंगनाथ गोविंद तिखे यांनाही नेपाळात पाठवले होते. या रंगनाथ तिख्यांचे धाकटे बंधू विनायक गोविंद तिखे हे पुढे जॅक्शन खून खटल्यातील एक आरोपी होते.[२४]

यवतमाळच्या टिळकभक्तांच्या गुप्त मंडळींच्या बैठका हया सोनोपंत टिकले यांच्या घरी माडीवर होत असत. गोपाळराव टांगो, गणपतराव माळवी, गोपाळराव बाजणे, डॉ. सिध्दनाथ कृष्णा केणे, यांनी गुप्त मंडळींच्या सभासदत्वाची शपथ घेतली होती. यवतमाळमध्ये क्रांतीकारक चळवळी अधिक प्रमाणात सुरु होत्या.[२५]

लोकमान्य टिळकांचे मित्र दादासाहेब खापर्डे हे सुद्धा क्रांतीकारक विचारांचे होते. त्यांच्यावर लोकमान्यांचा विशेष प्रभाव होता. क्रांतीकारक दामोदर चाफेकर अमरावतीत दादासाहेब खापर्डे यांचेकडे येऊन राहिले होते. हैद्राबादला क्रांतीकारक रुद्र नारायण प्रताप यानेही काही दिवस अमरावतीला दादासाहेब खापर्डे यांचाच आश्रय घेतला होता. दादासाहेब आणि बै.वि.दा. सावरकर यांचेही घनिष्ठ संबंध होते.[२६]

लोकमान्य टिळकांच्या विचारांनी प्रेरित होऊन या क्रांतीकारकांनी भारतीय स्वातंत्र्यलढयात आपले योगदान दिले आहे.

## * वऱ्हाडातील होमरुल चळवळ आणि लोकमान्य टिळकांचा स्वराज्य दौरा :—

महाराष्ट्रात होमरुल लीगच्या स्थापनेसाठी पुण्यात लोकमान्य टिळकांनी एक सभा घेतली होती. या सभेचे अध्यक्षस्थान वऱ्हाडातील नेते दादासाहेब खापर्डे यांना दिले होते.

मध्यप्रांत आणि वऱ्हाडमध्ये प्रांतीय होमरुल लिगची स्थापना डॉ. हरिसिंह गौर यांच्या अध्यक्षतेखाली इ.स. १९१६ मध्ये झाली होती. या सभेच्या सचिवपदी मुंजे यांची निवड करण्यात आली होती.[२७]

होमरुल लिगच्या विस्तार वऱ्हाडमध्येही होत असल्याने ब्रिटिश सरकार बिथरले आणि त्यांनी दडपशाहीचे धोरण अंमलात आणले.

होमरुलचा प्रचार होण्याकरिता 'यवतमाळ डिस्ट्रीक्ट असोशिएशनचे अधिवेशन ६ आणि ७ मे १९१६ रोजी यवतमाळ या ठिकाणी भरविण्यात आले होते. होमरुल लिगच्या शाखा विदर्भात ठिकठिकाणी स्थापन झाल्या होत्या.[२८]

भारतातील वातावरण तापत होते. सरकार विरोधी भूमिका अधिक तीव्र होत होती. होमरुल चळवळीने त्यात आणखीनच भर घातली होती. हयाच काळात पहिले महायुद्ध ही सुरु होते. त्यामुळे भारतीयांच्या भावनेकडे ब्रिटिशांना दुर्लक्ष करणे जमणारे नव्हते, यासाठी भारतमंत्री मॉटेग्यूने काही घोषणा केल्या होत्या.

अखिल भारतीय कॉंग्रेसच्याा कलकत्ता अधिवेशनात भारतमंत्री मॉटेग्यूने केलेल्या घोषणेबाबत कॉंग्रेसने काय भूमिका घ्यायचीहा चर्चेचा मुद्दा होता. तसेच स्वंशासनाची मागणी इंग्लंडमधील ब्रिटीश सत्ताधाऱ्यांच्या कानी घालावी यासाठी कॉंग्रेसने एक शिष्टमंडळ इंग्लंडला पाठवावे असे कलकत्ता अधिवेशनात ठरले. या शिष्टमंडळात महाराष्ट्रातील लोकमान्य टिळक, वऱ्हाडचे दादासाहेब खापर्डे, न. चि. केळकर यांचा समावेश होता. एप्रिल १९१८ मध्ये ते शिष्टमंडळ इंग्लंडला जाण्यासाठी निघाले परंतू भारत सरकारने त्यांना परवाना नाकारल्यामुळे कोलबोहून त्यांना परत यावे लागले.[२९] यातील वऱ्हाडचे नेते दादासाहेब खापर्डे यांचा समावेश वऱ्हाडसाठी खास बाब होती. यामुळे अखिल भारतीय स्तरावर वऱ्हाडचे महत्त्व अधोरेखित झाले होते.

५ फेब्रुवारी १९१८ पासून लोकमान्य टिळकांनी वऱ्हाडची सुप्रसिध्द स्वराज्ययात्रा आरंभली होती. तत्पुर्वी या संपूर्ण दौऱ्याची पूर्वतयारी दादासाहेब खापर्डे आणि वीर वामनराव जोशी यांनी केली होती. त्यांनी टिळकांना भेटण्यासाठी गेल्यावर वऱ्हाडातील जिल्हया जिल्हयांचे नकाशे पुण्यात आणले होते. असंख्य तारा व पत्रे पाठवून टिळकांनी आमच्या गावात मुक्कामला येण्याचे निमंत्रण वऱ्हाडातील जनतेने टिळकांना दिले होते. कार्यक्रम पत्रिका छापून त्या गावोगावी वाटप केल्या होत्या. दौऱ्याची सुरुवात बुलढाण्यातील खामगावापासून झाली होती. दौऱ्यात एकंदर चार मोटारींची व्यवस्था करण्यात आली होती. एका मोटारीतून वामनराव जोशी, दवंडे, बल्लाळ वगैरे मंडळी पुढच्या मुक्कामाला जाऊन आगाऊ व्यवस्था करीत असत.[३०]

बुलढाणा चिखली खामगाव, जळगाव, शेगाव, तेल्हारा, अकोट, अकोला, वाशीम, पुसद, कारंजा, मूर्तिजापूर, पुलगाव, चांदा, वणी, पांढरकवडा, वरोडा, वर्धा, शिंदी, उमरेड, काटोल (नागपुर) भंडारा या ठिकाणी लोकमान्य टिळकांनी वऱ्हाडात विदर्भात भेटी दिल्या.[३१]

प्रत्येक व्याख्यानात लोकमान्य टिळकांकडून स्वराज्याची मागणी होत असे या दौऱ्यात सोळा दिवसात लोकमान्य टिळकांची वऱ्हाड – नागपूरमध्य एकूण ३२ व्याख्याने झाली होती.[३२]

## * निष्कर्ष :–

लोकमान्य टिळकांनी वऱ्हाडचे अनेक वेळा दौरे केले होते. त्यामुळे वऱ्हाडातील जनतेवर टिळकांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. तरुण वर्ग, विद्यार्थी वर्ग, स्त्रिया या सर्वांनी टिळकांच्या प्रत्येक कार्यक्रमाला साथ दिली होती. दादासाहेब खापर्डे आणि लोकमान्य टिळक एकमेकांचे चांगले स्नेही बनले होते. त्यामुळे लोकमान्य टिळकांचे वऱ्हाडात अनेक अनुयायी बनले होते. लोकमान्य टिळकांचा वऱ्हाड दौरा तर स्वराज्याच्या दष्टीने महत्वाचा होता. लोकमान्य टिळकांचे जहाल विचार वऱ्हाडातील लोकांना आवडत असत त्यामुळेच वऱ्हाडातील जनतेने प्रत्येक सभेला भरघोस प्रतिसाद दिल्याचे आढळून येते. लोकमान्य टिळकांच्या विविध कार्यक्रमाला वऱ्हाड वासियांनी भरघोस पाठिंबा दिला होता. ब्रिटिशांच्या अन्यायाने जनता त्रस्त झाली होती. लोकमान्य टिळकांच्या जहाल विचारांनीच त्यामुळेच वऱ्हाड वासियांना आकर्षण वाटले होते. ब्रिटिशांच्या तावडीतून लोकमान्य टिळक आपल्याला

मुक्त करु शकतात असा विश्वास वऱ्हाडातील लोकांना वाटल्यानेच वऱ्हाडी जनतेने लोकमान्य टिळकांच्या वंगभंग आंदोलन, होमरुल चळवळ असो वा लोकमान्यांचा वऱ्हाड दौरा असो जनतेने भरघोस पाठिंबा दिल्याचे दिसून येते.

## संदर्भसूची


१. वाक्काणी नि.आ., आधुनिक विदर्भाचा इतिहास, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर २००३, पान नं. ६.
२. खापर्डे वासुदेव बळवंत, भारतरत्न गणेश श्रीकृष्ण उपाख्य दादासाहेब खापर्डे यांचे जीवन चरित्र, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, २००९, पान नं.१५
३. पेशवे वसंत बाळासाहेब, पेशवे मंदाकिनी, यवतमाळ जिल्हयातील स्वातंत्र्यलढा, ऑगस्ट क्रांती, सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई, पान नं. ११.
४. कित्ता, पान नं.—१०.
५. वाक्काणी नि.आ., उपरोक्त, पान नं.—५८.
६. कित्ता, पान नं. ५९.
७. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, नागपूर जिल्हा भाग—१, दार्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई —२००५, पान नं.—२११.
८. खापर्डे वासुदेव बळवंत, उपरोक्त, पान नं. २६.
९. प्रधान जी.पी., लोकमान्य टिळक, जैको पब्लिकेशन्स, मुंबई, २०११, पान नं. ५०
१०. वाक्काणी नि.आ., उपरोक्त, पान नं. ५६.
११. मराठे अ.वा., कर्मवीर आणि राष्ट्रसुत्रधार लोकमान्य टिळक, धि बॉम्बे टेनट्स, असोशिएशन मुंबई, १९३३, पान नं. ११५.
१२. करंजकर भि.दे. ,अमरावती शहराचा इतिहास भाग पहिला व दुसरा सचित्र, अमरावती नगरपालीकेच्या शताब्दी महोत्सवानिमित्त प्रकाशित, १९७८, पान नं.२१९.
१३. फाटक न.र., लोकमान्य, मौज प्रकाशन गृह, मुंबई, २०१२, पान नं. ११७—११८.
१४. जावडेकर श.द., आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००९, पान नं. २८०.
१५. चौधरी के. के., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, म.रा.सा. आणि संस्कृती मंडळ, मुंबई २०१५, पान नं. ३९९.
१६. फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड—१, श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९८९, पा नं. १०६—१०७.
१७. कोलारकर श.गो., आधुनिक विदर्भाचा इतिहास, श्री. मंगेश प्रकाशन, नागपुर, २००३, पान नं. ३२.
१८. फाटक न.र., उपरोक्त पान नं. २५६—२५७.
१९. बेकर डी.इ.यू., पॉलिटिक्स इन अे बिलिंग्युएल प्रोव्हिन्स ॲण्ड बेरार इंडिया, १९१९—१९३९ (अप्रकाशित), १९६९, पान नं. —४६.
२०. पेशवे वसंत बाळासाहेब, पेशवे मंदाकिनी, उपरोक्त पान नं. १४—१६.
२१. पाठक दमयंती, वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील सहकार्य, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, २००३, पान नं.३४.
२२. कित्ता, पान नं. ३७,
२३. हळबे अरुण, शतकातलं यवतमाळ, लोकमत, २००८, पा नं.३४—३५.
२४. फडके य.दी., लोकमान्य टिळक आणि क्रांतीकारक श्रीविद्या प्रकाशन पुणे, २०००, पान नं. ४०—४३.
२५. केसरी, ११ मे १९५२.

२६. कोलारकर श.गो., उपरोक्त, पान नं. ७२.
२७. वाक्काणी नि.आ., उपरोक्त पान नं. — ६८.
२८. कोलारकर श.गो., उपरोक्त पान नं. ५४.
२९. वैद्य सुमन, कोठेकर शांता, महाराष्ट्रातील कॉंग्रेसचा स्वातंत्र्यलढा, म.रा.सा. आणि सं.मंडळ, मुंबई, २००८, पान नं. १२२.
३०. केळकर न.चिं., लोकमान्य टिळकांचे चरित्र खंड ३, वरदा बुक्स, नवी दुसरी आवृत्ती, पुणे, १९८८, पानं नं. ३२—३३.
३१. फाटक न.र., उपरोक्त पान नं. ४९३.
३२. कित्ता, पानं नं. ३८५.